# अखेर सिडकोची शरणागती; आमरण उपोषण आंदोलनास यश
## अखंडित पाणी पुरवठा, घनकचऱ्याचे नियोजन यांसह सिडकोकडून सर्व मागण्या मान्य

पनवेल(प्रतिनिधी) नविन पनवेलमध्ये प्राथमिक नागरी सुविधा पुरविण्याबाबत तातडीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी कर्तव्यात कसूर करणाऱ्या सिडको प्रशासनाच्या विरोधात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या आमरण उपोषण आंदोलनाचा धसका घेऊन आज (दि.२८) चौथ्या दिवशी सिडकोने शरणागती पत्करून उपोषणकर्त्यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. यासंदर्भात मागण्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्याचे लेखी आश्वासन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी दिले आहे. हे पत्र सिडकोचे मुख्य अभियंता संजय चौधरी यांनी उपोषणस्थळी भेट घेवून आमदार प्रशांत ठाकूर व नगरसेवक संतोष शेट्टी यांना दिले. त्यानंतर नारळ पाणी व लिंबू सरबत देवून चार दिवसांचे हे आंदोलन थांबविण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी व जयघोष करत एकच जल्लोष केला.

व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी दिलेल्या पत्रात सांगितले आहे की, घनकचरा व्यवस्थापाबाबत सिडकोच्या संबंधित विभागास सर्व सुचना देण्यात आल्या आहेत. या सुचनांची अंमलबजावणी प्राधान्याने केले जातील, यासाठी मुख्य आरोग्य अधिकारी यांनी सुधारित वेळापत्रक तयार केल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. पाणी पुरवठासंदर्भातही आंदोलकांच्या मागणीस अनुसरून अधिकाऱ्यांची विस्तृत चर्चा करून आवश्यक कार्यवाही होण्याच्या सुचना व आदेश देण्यात आल्याचे सांगून सर्व सुचना व मागण्यांना योग्य न्याय देण्याची शाश्वतीही संजय भाटिया यांनी लेखी पत्रातून दिली आहे.

सिडकोने दिलेल्या लेखी आश्वासनात कचरा घंटागाडीच्या फेऱ्यांमध्ये वाढ करणार, कचराकुंडयांची संख्या वाढवणार, खराब झालेल्या कचराकुंडया एक महिन्याच्या आत दुरूस्त करणार व ज्या दुरूस्त होणार नाहीत अशा २६ ठिकाणी नवीन कचराकुंडया बसविणार, हॉटेल, मार्केट तसेच वाणिज्य व्यवसायांकरिता रात्री ०९ ते १२ या कालावधीत दोन मोठी वाहने घनकचरा उचलणार, रहिवाशी सोसायटींची संपर्क करून घनकचऱ्याचे नवीन डबे खरेदी करून इमारतींसमोरूनच घनकचरा उचलणार, रस्ते व फुटपाथ खराब होत असल्याने जेसीबी, डंम्परच्या सहाय्याने कचरा उचलणे बंद करणार, डास प्रधिबंधक धुरीकरण वाढवणार, साफसफाई कामावर देखरेख, घनकचरा, घंटागाडयांच्या वेळा बदलणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, व सार्वजनिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी एजन्सी नेमणार, यासाठी सोसायटयांच्या बैठका घेणार असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. पाणी पुरवठयाबाबत सिडको अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत सकारात्मक भुमिका घेत सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, मोठया वाहिन्यांच्या दुरूस्ती कामांदरम्यान दोन दिवसांपेक्षा अधिक काळ पाणी पुरवठा होऊ शकत नसेल तर सिडकोकडून सर्व सोसायटींना टँकरव्दारे पाणी केला जाईल तसेच पाणी कायम अखंडीत सुरू राहण्यासाठी पुढील एक वर्षात नवीन यंत्रणा राबविली जाणार असल्याचे सांगून सिडको अधिकाऱ्यांनी यावेळी आंदोलकांना आश्वासित केले. त्याचबरोबर नादुरूस्त पथदिवे, गटारांची दुरावस्था, रस्त्यांवरील खडडे, बगीच्यांचे सुशोभिकरण याबाबतही आंदोलकांनी केलेल्या मागण्या पूर्ण करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

नविन पनवेलमध्ये सिडकोने पाणी, स्वच्छता, रस्ते आदी नागरी सुविधा व्यवस्थितरित्या पुरवाव्यात या मागणीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी उपनगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या नविन पनवेल कार्यालयासमोर शुकवार पासून आमरण उपोषणास सुरू करण्यात आले होते. नगरसेवक संतोष शेट्टी यांच्यासह नगरसेविका सिताताई पाटील, न्यू पनवेल रेसिडेन्ट फोरमचे अध्यक्ष कॅप्टन तलवार सिंग, मधुसूदन देसाई, नामदेव लोखंडे, अनिता रणदिवे, रिमा रावत, शोभा सातपुते, पश्चिम महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील, अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष मुदस्सर गोलंदाज, युवक कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष राजेंद्र सणस, जितेंद्र तिवारी, श्रीचंद भंडारी, आशा शेट्टी या उपोषणकर्त्यांच्या आंदोलनास शेकडो संस्था-संघटनांनी लेखी पाठिंबाही दिला होता. शुकवारपासून सुरू झालेल्या या आंदोलनात सिडकोचे प्रशासकीय अधिकारी पी.एम.तांबडे यांच्यासह मुख्य आरोग्य अधिकारी बी.एस.बाविस्कर, पाणी पुरवठा अधिकारी एस.एन.पाटील यांनी दोनवेळा आंदोलकांशी चर्चा केली होती मात्र सिडकोकडून योग्य कार्यवाहीचे कोणतेही ठोस उत्तर न आल्याने आंदोलनाचा पवित्रा कायम ठेवण्यात आला. सिडको प्रशासनाने चालविलेल्या हलगर्जी कारभाराविरोधात अत्यंत तीव्र झालेल्या आंदोलनाच्या पाश्वभूमीवर सोमवारी (दि.२८ जुलै) 'सिडको गेट बंद' आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.

**या महत्वपूर्ण आंदोलनामुळे नविन पनवेलमध्ये सार्वजनिक सुविधांबाबत सिडकोकडून ठोस अंमलबजावणी करण्यात येणार आहे.सुविधा अधिक गतीने पुरविल्या जाव्यात यासाठी होणार असलेल्या बदलांचा फायदा सिडकोने वसविलेल्या कळंबोली, कामोठ, खारघरमधील वसाहतींनाही होणार आहे. हे आंदोलन उपोषणकर्ते, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संस्था-संघटना व नागरिकांच्या सहकार्यामुळे व एकजुटीमुळे यशस्वी झाले आहे. यशस्वी आंदोलनास साथ देणाऱ्या सर्वांचे आभार. सिडकोने आपला शब्द पाळला नाही, तर अधिक तीव्र आंदोलन करण्यात येईल. -आमदार प्रशांत ठाकूर**